714


# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

सिडको भवन, २रा मजला (दक्षिण कक्ष), बेलापूर, नवी मुंबई -४००६१४
दूरध्वनी : ०२२-२२०२६५४९, २२८३५२४७,२२०२५३५४
ई-मेल : ms.mjp2022@gmail.com, mjpcao@gmail.com


रजिस्टर पोस्टाने

जा.क्र.मजीप्रा-२०२५/प्र.क्र.५४/आस्था-१ (उप अभि.) दिनाक :- २७/०२/२०२६

स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ च्या प्रक्रियेअंती निवड झालेल्या उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील उप अभियंता (स्थापत्य) गट-अ या पदावर सरळसेवेने तात्पुरती नियुक्ती देणेबाबत.

## कार्यालयीन आदेश

**वाचा :-**

१ सामान्य प्रशासन विभाग, अधिसुचना क्रमांक एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/ बारा, दिनांक २१ जून, २०२१

२ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई अधिसुचना क्र.११२१/ प्र.क्र.५२/ पापु-२३, दिनांक १६ फेब्रूवारी, २०२४

३ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई शासन निर्णय क्र.मजीप्रा/ प्र.क्र.२४७ (भाग-१)/पापु-२३, दिनांक १८ जून, २०२४

४ महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई यांचे पत्र दिनांक १८ जुलै, २०२५

५ पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.मजीप्रा-११२१/ प्र.क्र.५३/ पापु-२३, दि.३१ जुलै, २०२५

६ मध्यवर्ती कार्यालयाचे समक्रमांकाचे पत्र दिनांक १० सप्टेंबर, २०२५


म.जी.प्रा. नवी मुंबई
उप अभियंता 2/3
शाखा आय.टी. सेल
आवक क्र.
दिनांक:-


पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय मुंबई यांनी संदर्भ क्र.५ येथील दि.३१ जुलै, २०२५ रोजीच्या पत्रान्वये, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून दि.१८ जूलै, २०२५ नुसार महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२३ च्या प्रक्रियेअंती निवड झालेल्या एकूण १०९ उमेदवारांची शिफारस प्राधिकरणास कळविली आहे. त्यापैकी श्री.शुभम उत्तमराव बरकले यांनी दि.३.११.२०२५ व श्री.सौरव दयानंद कुमार यांनी दि.१९.१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये नियुक्तीसाठी इच्छूक नसल्याबाबत प्राधिकरणास कळविले आहे. त्यानुसार, महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने शिफारस केलेल्या १०९ उमेदवारांपैकी १०७ उमेदवारांना सोबत जोडलेल्या परिशिष्ट-अ प्रमाणे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये उप अभियंता (स्थापत्य) गट-अ सरळसेवा या पदावर सातव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर एस-२० (रुपये ५६१००-१७७५००) मध्ये ते ज्या दिवशी रुजू होतील त्या दिनांकापासून त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवर्गामध्ये तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

२. **परिशिष्ट-"अ"** येथील उमेदवारांना महाराष्ट्र शासकीय गट-अ व गट-ब (राजपत्रित व अराजपत्रित) पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नियुक्तीसाठी महसूली विभाग वाटप नियम, २०२१ मधील तरतुदी लागू राहतील.

साने - Publish.

Received
02/03/2026

३. सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी-२७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दि.२२ जुन, २०२१ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवरील **उप अभियंता (स्थापत्य) गट-अ (सरळसेवा) या पदावरील उमेदवारांना दोन वर्षांचा परिवीक्षाधीन कालावधी लागू राहील. सदर कालावधीत उमेदवार परिवीक्षा धोरणानुसार शासकीय कामकाज करण्यास सक्षम नसल्याचे सिध्द झाल्यास त्यांची प्राधिकरणातील सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल.** उमेदवारांची नियुक्ती ही दोन वर्षाचा परिवीक्षा कालावधी समाधानकारकरित्या पूर्ण करण्याच्या व खालील विहित अटी/शर्तीच्या अधीन राहिल :-

(१) सदर उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या आस्थापनेवर नियुक्तीने देण्यात आलेली पदस्थापना ही अंतिम असून त्यात बदल होणार नाही.

(२) **परिशिष्ट-"अ"** मधील परिवीक्षाधीन उमेदवारांनी त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या सविस्तर पदस्थापनेच्या ठिकाणी आदेशाच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत तात्काळ रुजू व्हावे. सदर विहित कालावधीत उमेदवार रुजू झाला/झाली नाही तर तो/ती नोकरीची संधी गमावेल व त्यांचा नियुक्तीकरिता विचार करण्यात येणार नाही. सदर उमेदवार वरील पदावरील नियुक्ती स्विकारण्यास इच्छूक नाहीत, असे गृहीत धरण्यात येईल व त्यांचे नियुक्तीचे आदेश आपोआप रद्द होतील. सदर उमेदवारांचा नियुक्तीकरीता कोणत्याही परिस्थितीत विचार करण्यात येणार नाही. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणाऱ्या कोणत्याही कारणांचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही.

(३) सर्व मुख्य अभियंता/सर्व अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांनी सदर उमेदवारांच्या रुजू दिनांकाबाबतचा अहवाल त्यांच्या रुजू अहवालाच्या प्रतीसह मध्यवर्ती कार्यालयास सादर करावा.

(४) एखाद्या उमेदवारास विहित कालावधीत अपरिहार्य, उचित कारणास्तव त्यांना रुजू होण्यासाठी मुदतवाढ हवी असल्यास उमेदवारांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ३० दिवसांच्या आत सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई यांना अर्ज सादर करावा. तद्नंतर प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. उचित कारणास्तव विहित कालावधीत मुदतवाढीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांना मुदतवाढ देण्याचा/नाकारण्याचा अंतिम निर्णय प्राधिकरणाचा राहील. रुजू होण्यास मुदतवाढ मिळालेले उमेदवार वगळता नियुक्तीच्या आदेशानुसार ३० दिवसांच्या आत रुजू न होणाऱ्या उमेदवारांना सेवा ज्येष्ठता गमवावी लागेल व त्यांची ज्येष्ठता, ते ज्या दिनांकास प्राधिकरणाच्या सेवेत रुजू होतील, त्या दिनांकास निश्चित करण्यात येईल.

(५) मुदतवाढीसंदर्भात सामान्य प्रशासन विभाग, शासन अधिसुचना क्रमांक : एसआरव्ही २०१६/प्र.क्र.२८१/१२, दिनांक २१ जून, २०२१ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येईल.

(६) पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मुंबई अधिसूचना क्र.मजीप्रा-११२१/प्र.क्र.५२/पापु-२३, दिनाक १६ फेब्रूवारी, २०२४ अन्वये, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणातील उप अभियंता (स्थापत्य) या संवर्गासाठी स्वतंत्र सेवाप्रवेश विनियम विहित करण्यात आले आहेत. या सेवाप्रवेश विनियमानुसार, सहाय्यक कार्यकारी अभियंता व सहाय्यक अभियंता श्रेणी-१ (स्थापत्य) या दोन्ही संवर्गातील अधिकाऱ्यांच्या ज्येष्ठतासुची उप अभियंता (स्थापत्य) गट अ (सरळसेवा) या पदनामाने एकत्रितपणे कशाप्रकारे ठेवण्यात

यावी, याबाबत मार्गदर्शन मिळणेबाबत पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडे प्राधिकरणाने दि.१६.१०.२०२५ व दि.२०.११.२०२५ रोजीच्या पत्रान्वये विनंती करण्यात आलेली आहे. प्रस्तुत प्रकरणी शासनाच्या मार्गदर्शनानुसार, उप अभियंता (स्थापत्य) गट-अ (सरळसेवा) या संवर्गात नियुक्त होणाऱ्या उमेदवारांची सेवाज्येष्ठता निश्चित करण्यात येईल व निश्चित होणाऱ्या सेवाज्येष्ठतेच्या अधीन नियुक्ती देण्यात येत आहे. तसेच शासनाने निश्चित केलेली सेवाजेष्ठता मान्य राहिल, असे बंधपत्र उमेदवारांनी देणे आवश्यक राहिल.

(७) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी २७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दिनांक २२ जून, २०२१ मधील तरतुदीनुसार **परिशिष्ट-"अ"** मधील उमेदवारांना परिवीक्षा कालावधीमध्ये कोणतीही वेतनवाढ अनुज्ञेय असणार नाही.

(८) परिशिष्ट-"अ" येथील उमेदवार मराठी व हिंदी भाषा परिक्षा अगोदरच उत्तीर्ण झाले नसतील किंवा उत्तीर्ण होण्यापासून सुट मिळाली नसेल, तर त्यांना मराठी व हिंदी भाषा परीक्षासंबंधी केलेल्या नियमानुसार भाषा परिक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

(९) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, दिनांक ७ ऑगस्ट, २००१ अन्वये शासन सेवेतील नियुक्तीकरिता संगणक हाताळणी/वापराबाबतचे ज्ञान एक आवश्यक अर्हता निश्चित करण्यात आली आहे. त्यानुसार सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.प्रशिक्षण २०००/प्र.क्र.६१/२००१/३९, १९ मार्च, २००३ अन्वये आवश्यक प्रमाणपत्र नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून दोन वर्षाच्या आत उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. जर त्यांनी विहित मुदतीत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर उक्त कालावधी संपताच, त्यांची सदर पदावरील सेवा कोणतीही पुर्वसुचना न देता समाप्त करण्यात येईल. तसेच, ज्यांना या बाबतीत सुट अनुज्ञेय आहे त्यांची प्रकरणे प्रचलीत शासन निर्णयानुसार संबंधित कार्यालय प्रमुखांनी तपासावीत.

(१०) मागास प्रवर्गाच्या राखीव पदावर (अ.जा., अ.ज., वि.जा.(अ), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व.) शिफारस झालेल्या तसेच आरक्षित प्रवर्गातील असून देखील आयोगाने ज्यांची खुल्या प्रवर्गातून शिफारस केली आहे अशा नियुक्ती दिलेल्या मागासवर्गीय उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केलेले नसल्यास, त्यांनी या आदेशाच्या दिनांकापासून ६ महिन्यांच्या आत जात प्रमाणपत्रांची वैधता, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. नियुक्ती देण्यात आलेल्या कार्यालयाने संबंधित मागासवर्गीय उमेदवारांच्या जात वैधता प्रमाणपत्रांच्या अनुषंगाने आवश्यक ती कागदपत्रे जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे पाठविण्याची कार्यवाही करावी. विहित मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर न केल्यास संबंधित उमेदवारांच्या सेवा प्रचलित नियमानुसार समाप्त करण्याची कार्यवाही करण्यात येईल.

(११) इतर मागासवर्ग, सामाजिक व शैक्षणिक मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्ग कल्याण विभाग, शासन निर्णय क्रमांक :- सीबीसी-२०२०/प्र.क्र.१८/मावक, दि.३१ जानेवारी, २०२० मधील तरतुदीनुसार, खुल्या प्रवर्गातील महिला, विजाभज, इमाव व विमाप्र प्रवर्गातील व्यक्ती, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासप्रवर्ग आणि या प्रवर्गात समाविष्ट मराठा समाज आणि आर्थिकदृष्टया दुर्बल प्रवर्ग या प्रवर्गातील प्रगत व उन्नत गटात समाविष्ट नसलेल्या व्यक्तींना सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेल्या उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या NCL प्रमाणपत्राच्या वैधता पडताळणीसाठी राज्यातील प्रादेशिक महसूली विभाग स्तरावर "विभागीय आयुक्त" यांच्या अध्यक्षतेखाली

गठीत करण्यात आलेल्या समितीकडून NCL प्रमाणपत्राची (उत्पन्नाच्या दाखल्याची) तपासणीअंती वैध ठरण्याच्या अटीच्या अधीन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येत आहे.

(१२) अनाथ प्रवर्गातून तसेच खेळाडू प्रवर्गातून शिफारसप्राप्त उमेदवारांना त्यांच्या अर्हता प्रमाणपत्रांच्या अनुकूल पडताळणी अहवालाच्या अधीन राहून नियुक्ती देण्यात येत आहे.

(१३) सर्व उमेदवारांनी रुजू होताना लहान कुटूंबाबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील.

(१४) वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक : अंनियो १००५/१२६/सेवा-४, दिनांक ३१ ऑक्टोबर, २००५ मधील तरतुदीनुसार, **परिशिष्ट-"अ"** मधील उमेदवारांना नवीन "परिभाषित अंशदान निवृत्तिवेतन योजना" लागू राहील.

(१५) **परिशिष्ट-"अ"** मधील उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या सेवेत रुजू झाल्यानंतर सेवेचा राजीनामा द्यावयाचा असल्यास, त्यांना शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही १०९२/१०३३/प्र. क्र.३३/९२/८, दिनांक २ डिसेंबर, १९९७ मधील तरतुदीनुसार, महाराष्ट्र जीवन प्राधिकरणास किमान १ (एक) महिन्याची आगाऊ नोटीस किंवा एक महिन्याचे वेतन देणे आवश्यक राहील. यासंदर्भातील राजीनामा स्विकारण्याचे अधिकार केवळ नियुक्ती प्राधिकारी म्हणजे सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांना असतील. क्षेत्रिय कार्यालयांनी परस्पर उमेदवारांचा राजीनामा स्विकृत करु नये किंवा मंजूर करु नये. तथापि, राजीनामा दिल्यानंतर पुन्हा राजीनामा मागे घ्यावयाचा असल्यास, त्यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्रमांक अंनियो-२०१९/प्र.क्र.४७०/सेवा-४, दिनांक ९ मे, २०२२ मधील तरतूदी लागू राहतील.

मात्र, गैरवर्तणुक, सेवानियमांचा भंग इत्यादी कारणांसाठी एखाद्या उमेदवाराची सेवा समाप्त करण्यासाठी वरील प्रमाणे उमेदवारास नोटीस देण्याचे बंधन महाराष्ट्र जीवन प्राधिकरणावर राहणार नाही.

(१६) **परिशिष्ट-"अ"** मधील उमेदवारांनी महाराष्ट्र राज्य प्रशिक्षण धोरणासंबंधी, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन निर्णय क्रमांक टीआरएन-०९/प्र.क्र.३९/०९/१२-अ, दि.२३ सप्टेंबर, २०११ मधील परिच्छेद सहा येथील तरतुदीनुसार प्रशिक्षण सुरु होण्यापूर्वी प्रशिक्षणार्थीने सक्षम प्राधिकाऱ्यास बंधपत्र लिहून द्यावे लागेल. जर एखादा प्रशिक्षणार्थी त्यांच्या परिवीक्षाधीन कालावधीत नोकरी सोडत असेल तर प्रशिक्षणावर खर्च झालेली रक्कम प्रशिक्षणार्थ्याकडून वसूल करण्यात येईल. त्यानुसार प्रत्येक प्रशिक्षणार्थ्याला संचालक तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक रोड यांना व नियुक्ती प्राधिकाऱ्यांकडे बंधपत्र भरुन सादर करणे बंधनकारक राहील.

(१७) महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम, १९८१ च्या नियम क्र.११ मधील तरतुदीनुसार सदर तात्पुरती नियुक्ती ज्या उमेदवारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र हा शासन आदेश निर्गमित करण्याच्या दिनांकास अप्राप्त आहेत, अशा परिशिष्ट-अ मधील अ.क्र.४७, ९८ व १०० उमेदवारांना वैद्यकीय मंडळाने शासकीय सेवेकरिता वैद्यकीयदृष्टया पात्र असल्याच्या अधीनतेने देण्यात येत आहेत. या क्रमांकापैकी कोणत्याही उमेदवारास वैद्यकीय मंडळाने शासकीय सेवेकरिता वैद्यकीयदृष्टया अपात्र ठरविल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यात येईल.

उर्वरित उमेदवारांचे वैद्यकीय प्रमाणपत्र संबंधित वैद्यकीय मंडळांकडून प्राप्त झाले आहेत.

(१८) **परिशिष्ट-"अ"** मधील उमेदवारांपैकी अ.क्र. ५८,६८,९० व ९८ या उमेदवारांचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी अहवाल संबंधित पोलीस आयुक्त/पोलीस अधीक्षक कार्यालयांकडून अद्याप अप्राप्त

आहेत. या उमेदवारांची नियुक्ती सामान्य प्रशासन विभागाच्या दि.९ जानेवारी, २००९ व दि.२८ ऑगस्ट, २०१७ च्या शासन निर्णयामधील, चारित्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र नियुक्ती आदेशापासून सहा महिन्यांच्या आत प्राप्त होण्याच्या अधीन राहून करण्यात येत आहे. उमेदवाराने सादर केलेली माहिती असत्य असल्याचे आढळून आल्यास तात्पुरते नियुक्तीपत्र रद्दबादल करुन भारतीय दंड संहितेनुसार फौजदारी कारवाई तसेच प्राधिकरणाच्या सेवेत कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात येईल. ६ महिन्यांच्या आत चारित्र्य पडताळणी अहवाल प्राप्त न झाल्यास सदर उमेदवारांची नियुक्ती आपोआप संपुष्टात येईल. तसेच, अहवाल असमाधानकारक असल्यास त्यांची नियुक्ती कोणतेही कारण न देता १ महिन्याची नोटीस देऊन समाप्त करण्यात येईल.

उर्वरित उमेदवारांचे चारित्र्य व पुर्व चारित्र्य अहवाल संबंधित पोलिस आयुक्त/अधीक्षक कार्यालयाकडून प्राप्त झाले आहेत.

(१९) संबंधित कार्यालय प्रमुख यांनी त्यांचे कार्यालयात रुजु होण्यासाठी येणा-या उमेदवारांचे सर्व संबंधित मुळ प्रमाणपत्रे तपासून खात्री करावी व मगच उमेदवारांना नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घ्यावे व त्यांचा रुजू झाल्याचा अहवाल मध्यवर्ती कार्यालयास तात्काळ सादर करावा.

(२०) विहित कालावधीत रुजू न झालेल्या **परिशिष्ट-"अ"** मधील उमेदवारांचा अहवाल संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता किंवा कार्यालय प्रमुख यांनी मध्यवर्ती कार्यालयास व संबंधीत मुख्य अभियंता यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा.

(२१) **परिशिष्ट-"अ"** मधील नियुक्ती करणेत आलेल्या उमेदवारांना महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या बाहेरील शासकीय/ निमशासकीय कार्यालयात प्रतिनियुक्ती दिल्यास, ती त्यांना स्विकारणे बंधनकारक राहील.

(२२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी २७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दिनांक २२ जून, २०२१ मध्ये नमुद केल्यानुसार, परिशिष्ट-अ मधील उमेदवार ज्या दिवशी रुजू होतील, त्या दिवसापासून नियमाप्रमाणे त्यांचे कार्यमुल्यमापन अहवाल लिहिण्यात यावेत व बदली झाल्यास ते संबंधित अधिकाऱ्याकडे पाठवून विभाग प्रमुखांनी याबाबत संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता व मध्यवर्ती कार्यालयास कळवावे.

(२३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र.परिवी २७१५/प्र.क्र.३०२/कार्या.८, दिनांक २२ जून, २०२१ मध्ये नमुद केल्यानुसार परिवीक्षाधीन कालावधीत रजेच्या तरतुदी लागू होतील.

(२४) **परिशिष्ट-"अ"** येथील उमेदवार जर शासनाच्या इतर विभागात काम करीत असतील तर संबंधित नियंत्रक अधिकाऱ्यांनी त्यांना नेमणूकीचे ठिकाणी हजर होण्याच्या दृष्टीने सदर सेवेतून कार्यमुक्त झाल्याचे अथवा तसे लेखी पत्र संबंधित मुख्य अभियंता/अधीक्षक अभियंता किंवा कार्यालय प्रमुख यांना सादर केल्याशिवाय त्यांना रुजू करुन घेता येणार नाही.

(२५) वरीलपैकी जे उमेदवार सेवेत रुजू होतील त्यांचे बाबतचा एकत्रित अहवाल तसेच जे रुजू होणार नाहीत त्यांचा गोषवारा व प्रशिक्षणार्थीकडून घेतलेले बंधपत्र एकत्रितरीत्या संबंधीत कार्यालयाने तात्काळ मध्यवर्ती कार्यालयास सादर करावे.

(२६) तसेच प्रशिक्षणादरम्यान सर्व उमेदवारांकडून महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (मीत्रा), नाशिक या संस्थेच्या प्रशिक्षणाबाबतच्या नियमांचे व शिस्तीचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे. उमेदवारांकडून नियमभंग झाल्यास संचालक तथा अधीक्षक अभियंता, (मीत्रा) नाशिक यांचेकडून संबंधिताविरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल.

(२७) **परिशिष्ट-"अ"** येथील उमेदवारांनी उप अभियंता (स्थापत्य) पदासाठी आवश्यक असलेली व्यावसायिक परीक्षा रुजू झाल्याच्या दिनांकापासून तीन वर्षाचे आत उत्तीर्ण होणे बंधनकारक आहे. विहित कालावधीमध्ये विहित परीक्षा उत्तीर्ण न झाल्यास किंवा कामाचा अपेक्षित दर्जा प्राप्त न केल्यास किंवा त्यांचे काम योग्य अथवा अनुरुप न आढळल्यास त्यांची नियुक्ती कोणतीही पूर्व सूचना न देता रद्द करण्यात येईल.

४. नियुक्ती देण्यात येत असलेल्या उमेदवारांनी नियुक्तीच्या/पदस्थापनेच्या ठिकाणी हजर न होता विशिष्ट ठिकाणी पदस्थापना/नियुक्ती मिळविण्यासाठी मा.लोकप्रतिनिधी/खाजगी व्यक्ती किंवा संघटना यांचे मार्फत दडपण/दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास, संबंधित उमेदवारांविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपिल) नियम, १९७९ मधील तरतुदींनुसार शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

मान्यतेने.

**(गजानन गुरव)**
**मुख्य प्रशासकीय अधिकारी**

**प्रत माहितीसाठी सादर :-**

- मा.मंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा अध्यक्ष, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
- मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता तथा उपाध्यक्षा, म.जी.प्रा. यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
- मा.प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
- सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, मुंबई
- अभियान संचालक, जल जीवन मिशन, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर नवी मुंबई.
- सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, नवी मुंबई. (पत्राने)

**प्रत माहिती व पुढील कार्यवाहीसाठी :-**

- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
- संचालक (वित्त), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडकोभवन (दक्षिण कक्ष), नवी मुंबई.
- मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग, ठाणे/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/ अमरावती/नागपूर.
- अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे/ पनवेल/पुणे/सांगली/नाशिक/ जळगाव/ अहिल्यानगर/छत्रपती संभाजीनगर/लातूर/नांदेड/अमरावती/अकोला/नागपूर/चंद्रपूर.

  क्षेत्रीय स्तरावरील प्रशिक्षण अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, संशोधन व प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांच्या मार्गदर्शनानुसार देण्यात यावे.

- संचालक तथा अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मीत्रा), शासकीय पाणी पुरवठा केंद्राच्या आवारात, आय.एस.पी. रोड., डिस्टलरी इस्टेट, नाशिक रोड.
- उप सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई
- कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण जलव्यवस्थापन विभाग/विभाग (सर्व) ---------
- कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व) ----------------------
- अवर सचिव (पापु-२३), पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग मंत्रालय, मुंबई
- अवर सचिव, राज्य पाणी व स्वच्छता मिशन, बेलापूर नवी मुंबई.
- उप अभियंता (आयटी सेल), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- वरिष्ठ लेखा अधिकारी (रोख शाखा), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, नवी मुंबई.
- कक्ष अधिकारी (आस्था-१ तांप्र.), महाराष्ट्र जीवन प्राधिकरण सिडको भवन, नवी मुंबई.
- संबंधित उमेदवार (रजिस्टर पोष्टाने)
- कार्यालयीन आदेश धारिका सन २०२६

महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आदेश क्र.मजीप्रा-२०२५/प्र.क्र.५४/आस्था-१ (उविअ), दिनांक २७ फेब्रूवारी, २०२६

"परिशिष्ट- अ"

उप अभियंता (स्थापत्य) गट-अ (सरळसेवा) पदावर नियुक्तीने पदस्थापना

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | श्री.सौरभ भरत पाटील | इ.मा.व. | खुला | नाशिक | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, जळगांव |
| २ | श्री.यश बाबासाहेब कोरुचे | अराखीव | खुला | पुणे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य. उपविभाग क्र.२, सातारा |
| ३ | श्री.तेजस दामू बडोगे | भ.ज.(क) | खुला | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग संगमनेर, जिल्हा परिषद अहिल्यानगर |
| ४ | श्री.कौस्तुभ अनिल पाटील | इ.मा.व. | खुला | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग अंमळनेर, जिल्हा परिषद जळगांव |
| ५ | श्रीमती तेजश्री भारत लेंडवे | आ.दु.घ. (महिला) | खुला (महिला) | पुणे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, वडूज जिल्हा सातारा |
| ६ | श्री.सत्यजीत संजय कापसे | अराखीव | खुला | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, नांदेड जिल्हा परिषद नांदेड |
| ७ | श्री.जयेश विजयकुमार सदावरे | इ.मा.व. | खुला | पुणे | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, माळशिरस जिल्हा परिषद सोलापूर |
| ८ | श्री.वैभव धनंजय कोळी | वि.मा.प्र. | खुला | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जळगांव जिल्हा परिषद जळगांव |
| ९ | श्रीमती सीमा बाळू माने | आ.दु.घ. (महिला) | खुला (महिला) | पुणे | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कडेगांव जि.प.सांगली |
| १० | श्री.मयंक विकासराव काळे | आ.दु.घ. | खुला | नागपूर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, आष्टी जिल्हा परिषद वर्धा |
| ११ | श्री.शुभम हरी शिंदे | आ.दु.घ. | खुला | पुणे | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जुन्नर जि.प.पुणे |
| १२ | श्री.शुभम सुनिल मुळे | इ.मा.व. | खुला | पुणे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, पंढरपूर |

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १३ | श्री.रोहन सखाराम शिगवण | इ.मा.व. | खुला | पुणे | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, करमाळा जिल्हा परिषद सोलापूर |
| १४ | श्री.तेजस संतोष कुदनर | भ.ज. (क) | खुला | पुणे | महराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य. उपविभाग, सांगोला |
| १५ | श्रीमती जान्हवी गजानन जळमकर | इ.मा.व. (महिला) | खुला (महिला) | कोकण-२ | म.जी.प्रा.गुणवत्ता परिक्षण व दक्षता पथक, सिडको भवन नवी मुंबई. |
| १६ | श्री.अनिकेत संजय केलो | अराखीव | खुला | अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य.उपविभाग, अंजनगाव |
| १७ | श्रीमती दर्शना राजेंद्र पाटील | इ.मा.व. (महिला) | खुला (महिला) | कोकण-२ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, ठाणे |
| १८ | श्री.संतोष शंकर सोलापूरे | अराखीव | खुला | पुणे | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जत जिल्हा परिषद सांगली |
| १९ | श्रीमती स्नेहा गोविंद मालू | अराखीव (महिला) | खुला (महिला) | पुणे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, उपविभाग, मिरज जि.सांगली |
| २० | श्री.सुमित सुर्यकांत पवार | अराखीव | खुला | पुणे | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, कराड |
| २१ | श्री.सागर धनंजय पर्बत | अराखीव | खुला | नागपूर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नागपूर |
| २२ | श्री.आशिष राजकुमार माहुरे | इ.मा.व. | खुला | नागपूर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, चंद्रपूर |
| २३ | श्री.कृष्णा बंडू शिंदे | भ.ज.(क) | खुला | नागपूर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, धानोरा जिल्हा परिषद, गडचिरोली |
| २४ | श्री.योगेश अजित पाटील | अराखीव | खुला | कोकण-२ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, पेण जि.रायगड |
| २५ | श्रीमती कल्याणी गणेश पाटील | अराखीव (महिला) | खुला (महिला) | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, एरंडोल, जिल्हा परिषद, जळगांव |
| २६ | श्री.अक्षय अर्जुन नागरगोजे | भ.ज.(ड) | खुला (खेळाडू) | छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र.२, बीड |
| २७ | श्री.गजानन साहेबराव धनेगांवकर | इ.मा.व. | खुला (खेळाडू) | छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, मंठा |

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| २८ | श्री.रोहित रामचंद्र पाटील | आ.दु.घ. | आ.दु.घ. | कोकण-१ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, सिंधुदूर्ग जिल्हा परिषद सिंधुदूर्ग |
| २९ | श्री.अनिकेत आनंदा शिंदे | इ.मा.व. | इ.मा.व. | कोकण-२ | जल जीवन मिशन, बेलापुर, नवी मुंबई |
| ३० | श्रीमती चारु भगवान करंभे | इ.मा.व. (महिला) | खुला (महिला) | नागपूर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य. उपविभाग क्र.१, गोंदिया |
| ३१ | श्री.तेजस सुभाष झाडे | इ.मा.व. | इ.मा.व. | अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मंडळ, अकोला |
| ३२ | श्रीमती प्रतिक्षा बाळासाहेब देवकर | इ.मा.व. (महिला) | खुला (महिला) | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, अहिल्यानगर जिल्हा परिषद अहिल्यानगर |
| ३३ | श्री.अंकूर अण्णासाहेब अडांगळे | अ.जा. | अ.जा. | नाशिक | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, कोपरगांव जिल्हा अहिल्यानगर |
| ३४ | श्री.धनंजय मच्छिंद्र जाधव | आ.दु.घ. | आ.दु.घ. | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, पाचोरा जिल्हा परिषद, जळगांव |
| ३५ | श्रीमती नंदिनी देविदास भुजबळ | आ.दु.घ. (महिला) | खुला (महिला) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग देवणी, जिल्हा परिषद, लातूर |
| ३६ | श्री.मयुर किशोर भदाणे | इ.मा.व. | इ.मा.व. | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग पारोळा, जिल्हा परिषद, जळगाव |
| ३७ | श्री.अंकूश रामहरी पावसे | इ.मा.व. | इ.मा.व. | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, पारनेर जिल्हा परिषद अहिल्यानगर |
| ३८ | श्री.अभिषेक बाळासाहेब जाधव | आ.दु.घ. | आ.दु.घ. | कोकण-२ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, अलिबाग जि.रायगड |
| ३९ | श्री.दिनेश अनंतराव जटाळे | इ.मा.व. | इ.मा.व. | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, परळी जिल्हा परिषद बीड |
| ४० | श्रीमती सई गुंडेराव कुलकर्णी | आ.दु.घ. (महिला) | खुला (महिला) | छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मंडळ, लातूर |

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ४१ | श्री.सुयोग पांडूरंग निकम | आ.दु.घ. | आ.दु.घ. | कोकण-२ | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, अलिबाग जिल्हा परिषद रायगड |
| ४२ | श्री.विवेक हर्षवर्धन घोगरे | इ.मा.व. | इ.मा.व. | अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र.१, अमरावती |
| ४३ | श्री.सुरज अरुणकुमार साकळे | आ.दु.घ. | आ.दु.घ. | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मंगरुळपीर जिल्हा परिषद वाशिम |
| ४४ | श्री.उदय आण्णासो पाटील | आ.दु.घ. | आ.दु.घ. | कोकण-२ | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, श्रीवर्धन जिल्हा परिषद रायगड |
| ४५ | श्रीमती जानवी राजेंद्र पवार | आ.दु.घ. (महिला) | आ.दु.घ. (महिला) | कोकण-२ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, नवीन पनवेल |
| ४६ | श्री.सौरभ विकास गावंडे | इ.मा.व. | इ.मा.व. | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, नेर जिल्हा परिषद यवतमाळ |
| ४७ | श्री.जीवनकुमार सुभाष खवरे | इ.मा.व. | इ.मा.व. | कोकण-२ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, स्थावर मालमत्ता कक्ष-९, बेलापूर नवी मुंबई |
| ४८ | श्री.प्रज्वल सुनिल घोडके | इ.मा.व. | इ.मा.व. | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग भुम, जिल्हा परिषद धाराशिव |
| ४९ | श्रीमती शीतल विलासराव मुळे | आ.दु.घ. (महिला) | आ.दु.घ. (महिला) | नागपूर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र.१, नागपूर |
| ५० | श्री.अमोल विलासराव चिरडे | इ.मा.व. | इ.मा.व. | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, तेल्हारा जिल्हा परिषद अकोला |
| ५१ | श्रीमती मोनाली धनाजी गिरी | भ.ज. (ब.) (महिला) | भ.ज.(ब) (महिला) | कोकण-१ | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, देवगड जिल्हा परिषद, सिंधुदूर्ग |
| ५२ | श्रीमती शिवानी सुनिल मगदुम | आ.दु.घ. (महिला) | आ.दु.घ. (महिला) | कोकण-१ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, सावंतवाडी जि.सिंधुदूर्ग |
| ५३ | श्री.अनिल अर्जुन पुरी | भ.ज. (ब.) | भ.ज.(ब) | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, रावेर जिल्हा परिषद जळगांव |

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ५४ | श्री.यशवंत रामदास गिते | भ.ज. (ड) | दिव्यांग | छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नांदेड |
| ५५ | श्री.योगेश दिपकराव सावरकर | अ.जा. | अ.जा. | अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अकोला |
| ५६ | श्री.विस्मित विठू बंडगर | भ.ज. (क) | भ.ज.(क) | कोकण-२ | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, माणगांव जिल्हा परिषद रायगड |
| ५७ | श्री.मयुर धोंडीराम शिंदे | इ.मा.व. | इ.मा.व. (खेळाडु) | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जामनेर जिल्हा परिषद, जळगांव |
| ५८ | श्री.सिध्दार्थ गणेश कदम | अ.जा. | अ.जा. | कोकण-२ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य.विभाग, अंबरनाथ |
| ५९ | श्री.प्रफुल्ल रोहिदास पाडवी | अ.ज. | अ.ज. | नागपूर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मुल जिल्हा परिषद चंद्रपूर |
| ६० | श्रीमती अश्विनी दिलीप घाटकर | इ.मा.व. (महिला) | इ.मा.व. (महिला) | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, पाथर्डी जिल्हा परिषद अहिल्यानगर |
| ६१ | श्रीमती प्रिती शहाजी म्हेत्रे | इ.मा.व. (महिला) | इ.मा.व. (महिला) | अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, प्रादेशिक विभाग (मु.अ.कार्यालय), अमरावती |
| ६२ | श्री. प्रविणकुमार ईश्वर गायकवाड | अ.जा. | अ.जा. | कोकण-१ | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मालवण जिल्हा परिषद सिंधुदूर्ग |
| ६३ | श्री. गौरव दिलीप कोकणी | अ.ज. | अ.ज. | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, भुसावळ जिल्हा परिषद जळगाव |
| ६४ | श्री. तेजस राजेश बोरसे | अ.जा. | अ.जा. | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, शेवगांव जिल्हा परिषद अहिल्यानगर |
| ६५ | श्रीमती लिनता रमेश खोरगडे | इ.मा.व. (महिला) | इ.मा.व. (महिला) | नागपूर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, मुल |
| ६६ | श्रीमती तन्वी रावसाहेब साळुंके | इ.मा.व. (महिला) | इ.मा.व. (महिला) | अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती |
| ६७ | श्रीमती दिव्या भगवंतराव वानखेडे | इ.मा.व. (महिला) | इ.मा.व. (महिला) | अमरावती | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, अमरावती |

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ६८ | श्री. अभिजित तानाजी भोसले | अ.जा. | अ.जा. | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, नायगांव जिल्हा परिषद नांदेड |
| ६९ | श्री. प्रथमेश चोखोबा सावंत | अ.जा. | अ.जा. | कोकण-१ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र.१, विरार जिल्हा पालघर |
| ७० | श्री. रोनित नितीन अजानळकर | अ.जा. | अ.जा. (खेळाडू) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, लोहारा जिल्हा परिषद धाराशिव |
| ७१ | श्री. सुदर्शन गजानन जठार | वि.मा.प्र. | वि.मा.प्र. | कोकण-१ | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण ज.व्य. उपविभाग क्र.२, विरार जिल्हा पालघर |
| ७२ | श्रीमती उर्मिला शिवाजी माने | भ.ज.(क) (महिला) | भ.ज.(क) (महिला) | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मलकापूर जिल्हा परिषद, बुलढाणा |
| ७३ | श्रीमती प्रियंका प्रल्हाद पवार | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला) | नागपूर | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, गोंदिया जिल्हा परिषद, गोंदिया |
| ७४ | श्री.प्रशांत अमृत गवळी | अ.ज. | अ.ज. | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, कळमनुरी जिल्हा परिषद हिंगोली |
| ७५ | श्रीमती रुक्मीणी रमेश खोब्रागडे | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला) | कोकण-१ | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, पालघर जिल्हा परिषद पालघर |
| ७६ | श्रीमती धनश्री साहेबराव धात्रक | भ.ज. (ड) (महिला) | भ.ज. (ड) (महिला) | नागपूर | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, भंडारा जिल्हा परिषद, भंडारा |
| ७७ | श्री. पंकज सुदाम मदगे | अ.ज. | अ.ज. | अमरावती* | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, दिग्रस जिल्हा परिषद यवतमाळ |
| ७८ | श्री. सोमीनाथ नारायण सदगर | भ.ज. (क) | अनाथ | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, आष्टी जिल्हा परिषद बीड |
| ७९ | श्रीमती स्नेहल हरिहर क्षिरसागर | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र.२, परतूर |

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ८० | श्रीमती लक्ष्मी लोकचंद बाळापुरे | अ.ज. (महिला) | अ.ज. (महिला) | नागपूर | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, चंद्रपूर जिल्हा परिषद चंद्रपूर |
| ८१ | श्री. राहुल रमेश कोवे | अ.ज. | अ.ज. | नागपूर | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, गडचिरोली जिल्हा परिषद, गडचिरोली |
| ८२ | श्रीमती पौर्णिमा रमेश कांबळे | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला) | पुणे | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, शिराळा जिल्हा परिषद सांगली |
| ८३ | श्रीमती श्वेता शिवाजी जाधव | वि.जा. (अ.) (महिला) | वि.जा.(अ) महिला | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, आर्णी जिल्हा परिषद यवतमाळ |
| ८४ | श्रीमती ऋतुजा प्रकाश वरवडे | वि.मा.प्र. (महिला) | वि.मा.प्र. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, उमरगा जिल्हा परिषद, धाराशिव |
| ८५ | श्रीमती कांचन सिताराम तळपे | अ.ज. (महिला) | अ.ज. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, लोहा जिल्हा परिषद, नांदेड |
| ८६ | श्री. तुषार नेमिनाथ चौगुले | अराखीव | दिव्यांग | पुणे | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग क्र.९, चंदगड जिल्हा परिषद कोल्हापूर |
| ८७ | श्री. प्रथमेश सुखदेव जाधव | वि.जा. (अ.) | दिव्यांग | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, तिवसा जिल्हा परिषद, अमरावती |
| ८८ | श्री. अक्षय लहु माने | अराखीव | खुला | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, बीड जिल्हा परिषद बीड |
| ८९ | श्री. दिगंबर बाळासाहेब पाटील | आ.दु.घ. | खुला | कोकण-१ | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग चिपळूण, जिल्हा परिषद रत्नागिरी |
| ९० | श्री. श्रीयश पोपट खरमाटे | अराखीव | खुला | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, माजलगांव जिल्हा परिषद बीड |
| ९१ | श्री. सिध्दांत अमोल निकम | आ.दु.घ. | खुला | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, महागांव जिल्हा परिषद, यवतमाळ |

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| ९२ | श्री. राजवर्धन रघुनाथ पाटील | अराखीव | खुला (खेळाडू) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, हिमायतनगर जिल्हा परिषद नांदेड |
| ९३ | श्री. राहुल बाळासो धनवडे | आ.दु.घ. | आ.दु.घ. | छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, परतूर |
| ९४ | श्रीमती प्रतिक्षा रमेश येसादे | आ.दु.घ. (महिला) | खुला (महिला) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मंठा जिल्हा परिषद जालना |
| ९५ | श्रीमती पल्लवी सुभाष सावंत | आ.दु.घ. (महिला) | खुला (महिला) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, निलंगा जिल्हा परिषद लातूर |
| ९६ | श्रीमती मानसी प्रभुराव जोशी | आ.दु.घ. (महिला) | आ.दु.घ. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, अंबाजोगाई जिल्हा परिषद, बीड |
| ९७ | श्रीमती स्नेहल रावसाहेब म्हेत्रे | इ.मा.व. (महिला) | इ.मा.व. (महिला) | नागपूर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळ, चंद्रपूर |
| ९८ | श्री. अभिजित संजय शेळके | अ.जा. | अ.जा. | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, अकोट जिल्हा परिषद अकोला |
| ९९ | श्री. प्रतिक नवनाथ कुचेकर | भ.ज. (क) | भ.ज. (क) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, शिरुर अनंतपाळ जिल्हा परिषद लातूर |
| १०० | श्री. अमोल बापू ठाकरे | अ.जा. | अ.जा. | नाशिक | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, चोपडा जिल्हा परिषद जळगांव |
| १०१ | श्री. अजय तुळसीदास हळदे | वि.मा.प्र. | वि.मा.प्र. | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, वाशी जिल्हा परिषद, धाराशिव |
| १०२ | श्री. नंदकिशोर सांदिपान भांगे | भ.ज. (ड) | भ.ज. (ड) | छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग, अंबेजोगाई |
| १०३ | श्री. अविनाश अशोक गायकर | भ.ज. (ब.) | भ.ज. (ब.) | छत्रपती संभाजीनगर | महाराष्ट्र जीवन प्राधिकरण उपविभाग क्र.१, जालना |
| १०४ | श्रीमती मेघना महेंद्र जोगदंड | अ.जा. (महिला) | अ.जा. (महिला) | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, गंगाखेड जिल्हा परिषद परभणी |

| अ. क्र. | म.लो.आ. ने शिफारस केलेल्या उमेदवाराचे नांव | उमेदवाराचा मुळ प्रवर्ग | म.लो.आ.ने शिफारस केलेला प्रवर्ग | महसुली विभाग वाटप नियम, २०२१ नुसार वाटप केलेला अंतिम महसूल विभाग | सविस्तर पदस्थापनेचे कार्यालय |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १०५ | श्री. सौरभ पुडंलिक कनोजे | अ.ज. | अ.ज. | छत्रपती संभाजीनगर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जिंतूर जिल्हा परिषद परभणी |
| १०६ | श्रीमती वृषाली संतु घाणे | अ.ज. (महिला) | अ.ज. (महिला) | अमरावती | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, मानोरा जिल्हा परिषद वाशिम |
| १०७ | श्री. लोकेश गजाननराव चोपडे | इ.मा.व. | दिव्यांग | नागपूर | ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, जिवती जिल्हा परिषद चंद्रपूर |

(गजानन गुरव)
मुख्य प्रशासकीय अधिकारी